मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in | पुणे, पिंपरी-चिंचवड | बुधवार, दिनांक १७ जानेवारी २०२४ । पान १

# स्मशानभूमीची अवस्था मरणासन्न; गैरसोयींमुळे नागरिकांना त्रास!

**मनीषा थोरात-पिसाळ**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मागील अनेक वर्षापासून मोशीतील इंद्रायणी घाटावरील स्मशानभूमीची दुरावस्था बिकट आहे. स्मशानभूमीची पुनर्बांधणी करण्याची मागणी ऐवढ्या वर्षापासून केली जातेय, मत्र प्रशासन डोळेझाक करत असल्याने स्मशानभूमीची अवस्था मरणासन्न झाली आहे. त्यामुळे लवकरात-लवकर पुनर्बांधणी करून, या ठिकाणी विद्युतदाहिणीचे आरक्षण असून, ते विकसित करण्याची मागणी मोशीकरांकडून केली जात आहे.

या परिसरातील स्मशान भूमीकडे ठिकठिकाणाहून मृतदेह अंतिम संस्कारासाठी आणले जातात. मात्र गैरसोयीमुळे येणा-या नागरिकांची विशेषतः महिलांची कुचंबना होते आहे. मृतदेहाला ठेवण्यासाठी असलेल्या जाळ्या, तुटलेले छत,उगवलेले गवत अंघोळीसाठी स्वच्छतागृहाची अपुरी सुविधा, प्रवेशद्वार नाही, पत्राशेड नसल्याने नागरिकांना पुलाखाली बसावे लागते. पावसाळ्या मध्ये तर स्मशाभूमीतील परिस्थीत याहून भयानक असते.

## स्मशानभूमीची पुनर्बांधणी करून विद्युतदाहिनीचे आरक्षण विकसित करण्याची मागणी







"पावसाळ्यात तर स्मशानभूमींची अवस्था आणखीच भयंकर होते. अंत्यविधी देखील व्यवसथितरित्या करता येत नाही. मागील दोन वर्षापूवी पावसाळ्यात ताडपत्री धरून अंत्यविधी करावा लागला आहे. स्मशानभूमीतील मूलभूत सुविधा पुरवण्याची तसदी महानगरपालिका घेत नसल्यामुळे या स्म शानभूमीची अवस्था मरणासन्न झाली आहे.

**-वसंत बोराटे,** माजी नगरसेवक



"स्मशानभूमीच्या दुरावस्थेबाबत अन याठिकाणी विद्युतदाहिनीचे आरक्षण असून, ते विकसित करावे अशी मागणी अनेक वर्षापासून केली जात आहे. प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे लवकरात-लवकर या गोष्टी पूर्ण कराव्यात.

**-गणेश सस्ते,** सामाजिक कार्यकर्ते



"मोशी स्मशानभूमीमध्ये अंतिम संस्कारासाठी परिसरातील अनेक नागरिक येतात.मात्र या ठिकाणच्या परिस्थी भयावह आहे. या स्मशानभूमीच्या दुरावस्थेचा आढावा घेऊन, महापालिका आयुक्तांकडे पुनर्बांधणीसाठी मागणी केली आहे. याठिकाणी होणारी महिलांची कुचंबना होऊ नये, यासाठी विशेषतः स्वच्छतागृह तातडीने करावे, अशी देखील मागणी केली आहे.

**-प्रा. कविता आल्हाट,**
शहराध्यक्षा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अजित पवार गट



"मोशी स्मशानभूमीसाठी एक एकरचे आरक्षण आहे. मात्र अजूनही ते आरक्षण महापालिकेच्या ताब्यात आलेले नाही. त्यामुळे आहे, त्या स्मशानभूमीची डागडुजी करून, व्यवस्थित केली जाईल. जेव्हा आरक्षण महापालिकेच्या ताब्यात येईन तेव्हा नवीन स्मशानभूमी उभारली जाईल.

**-देवेंद्र बोरावके,**
कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, महापालिका

# श्री खंडोबा यात्रेनिमित्त आकुर्डीतील वाहतुकीत बदल!

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आकुर्डी गावचे ग्रामदैवत श्री खंडोबा देवाची यात्रा सुरू असून यात्रेनिमित्त अनेक भाविक खंडोबामाळ चौकातील श्री खंडोबा मंदिरात दर्शनासाठी येत असतात. या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी खंडोबामाळ चौकाकडे येणाऱ्या वाहतुकीत बुधवारी (ता. १७) बदल करण्यात आला आहे. थरमॅक्स चौकाकडून येणारी वाहने आर. डी. आगा मार्गाकडून गरवारे कंपनी कंपाउंडपर्यंत येऊन तेथील टी जंक्शनवरून खंडोबामाळ चौकाकडे न जाता डावीकडून परशुराम चौकातून मोहननगर-चिंचवड मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच परशुराम चौकाकडून येणारी वाहने खंडोबामाळ चौकाकडे न येता परशुराम चौकातून आर. डी. आगा मार्गे गरवारे कंपनी कंपाउंड टी जंक्शनवरून उजवीकडे वळून इच्छितस्थळी जातील. चिंचवड, दळवीनगर व आकुर्डी गावठाणातून येणाऱ्या वाहनांना खंडोबामाळ चौकाकडून थरमॅक्स चौकाकडे जाण्यास प्रवेश बंद असेल. या मार्गावरील वाहने लोकमान्य टिळक चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक बाजूकडे वळून इच्छितस्थळी जातील. तर लोकमान्य टिळक चौकाकडून येणाऱ्या वाहनांना खंडोबामाळ चौकातून थरमॅक्स चौक बाजूकडे जाण्यास प्रवेश बंद असून या मार्गावरील वाहने सरळ चिंचवड स्टेशन, दळवीनगर मार्गे इच्छितस्थळी जातील. हा बदल पहाटे पाच ते रात्री दहापर्यंत असेल.

# डान्स खेळाडूंना शासनाने व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज : मेहबूब शेख

## राष्ट्रवादी युवकच्या जिल्हास्तरीय डान्स स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) आयोजित शरद कला व क्रीडा महोत्सव जिल्हास्तरीय डान्स स्पर्धेस शहरातील तीनही विधानसभेतील नागरिकांकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण एक लाख रुपयांहून अधिक रोख रक्कम आणि पारितोषिके देण्यात आली. ही स्पर्धा ग्रुप डान्स व सोलो डान्स या प्रकारात घेण्यात आली. ग्रुप डान्स प्रकारात जी एन डी ग्रुप यांनी प्रथम क्रमांक, टीम डान्सहूड ग्रुप यांनी द्वितीय क्रमांक, तृतीय क्रमांक डी डब्ल्यू एम क्र्यू ग्रुप आणि उत्तेजनार्थ क्रमांक गेम चेंजर ग्रुप यांनी पटकावला. तर, सोलो डान्स या प्रकारात प्रथम क्रमांक प्रदीप गुप्ता, द्वितीय क्रमांक साजन तमांग, तर तृतीय क्रमांक इशिता बरवडे, उत्तेजनार्थ रोहन उंबारे यांना मिळाला. आयोजकांच्या वतीने सर्व सहभागी स्पर्धकांना सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्र देण्यात आले. राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई शेख, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे यांच्या हस्ते या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ पार पडला. मेहबूब शेख म्हणाले पिंपरी चिंचवड युवक काँग्रेसने डान्स स्पर्धा आयोजित करून शहरातील अनेक नृत्य कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले याचा मला अभिमान वाटतो. नृत्य कलाकारांच्या अथक परिश्रम बघता राज्य शासनाने नृत्य कलाकार यांना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज आहे अशी अपेक्षा व्यक्त केली. महाविकास आघाडीचे मावळ लोकसभेचे संभाव्य उमेदवार शिवसेना नेते संजोग वाघेरे यांनी आवर्जून उपस्थिती लावत स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या व राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या टीमचे कौतुक केले. इम्रान शेख म्हणाले पिंपरी चिंचवड शहरातील नृत्य कलाकारांची संख्या लक्षणीय असून महापालिकेने खेळाडू दत्तक योजनेत नृत्य स्पर्धकांना सहभागी करून द्यावे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. सुनील गव्हाणे म्हणाले.पवार साहेबांच्या कार्यकर्तृत्वामुळे पिंपरी चिंचवड शहराच्या औद्योगीकरणाची भरभराट झाली. पुढे उद्योगनगरीची आयटीनगरी करण्याचं काम देखील आदरणीय पवार साहेबांनीच केलं. ही नगरी आता स्वतःची ओळख सांस्कृतिक नगरी म्हणून करू पाहत आहे. कामगार नगरी ते सांस्कृतिक नगरी या वाटचालीत शरद पवार साहेबांचे योगदान अनन्य साधारण आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये मात्र भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मात्र या शहरात फक्त टक्केवारी खाण्याचे काम केले हे दुर्दैव आहे.

या स्पर्धेचे पर्यवेक्षक म्हणून अक्षय ढेरे, प्रेरणा साळवी, भाग्यशी जाधव यांनी काम पाहिले तर साई काळे व राष्ट्रवादी युवक काँग्रेस टीमने या कार्यक्रमाचे नियोजन शिस्तबद्ध पद्धतीने केले. यावेळी माजी विरोधी पक्षनेते मच्छिंद्र तापकीर, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रकाश मस्के, महिला शहराध्यक्ष ज्योती निंबाळकर, प्रदेश संघटक राहुल पवार युवक कार्याध्यक्ष सागर तापकीर, कामगार नेते काशिनाथ नखाते, भोसरी विधानसभा अध्यक्ष एडवोकेट संतोष शिंदे, पुणे शहर युवक अध्यक्ष किशोर कांबळे, औरंगाबाद संभाजीनगर जिल्हा कार्याध्यक्ष फारुख शेख, सचिन निंबाळकर, पुणे शहर युवती पदाधिकारी भक्ती कुंभार, पायल चव्हाण, तसेच माजी उपमहापौर विशांती पाडळे, महिला पदाधिकारी रेखा मोरे, स्वप्नाली असोले, शोभा साठे, अंजना गायकवाड, राजेंद्र हरगुडे, बंडू माळी, अनिल भोसले, नितीन मोरे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी विकास कांबळे, मेघराज लोखंडे, मयूर थोरवे, अमोल माळी, ऋषिकेश गारडे, निलेश निकाळजे, हाजी मलंग शेख, साहिल वाघमारे, शाहिद शेख, आश्फ शेख, साहिल शिंदे, मयूर खरात, पियूष अंकुश, रजनीकांत गायकवाड, नितीन शिंदे आणि मोठ्या संख्येने युवक पदाधिकारी उपस्थित होते.

# शहर पोलीस दलातील सहाय्यक आयुक्तांच्या अंतर्गत बदल्या!




**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड शहर पोलीस दलातील सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या अंतर्गत बदल्या झाल्या. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या बदल्या केल्या जात आहेत. सोमवारी (दि. १५) दोन सहाय्यक आयुक्त यांच्या बदल्या झाल्या. त्यानंतर मंगळवारी आणखी तिघांच्या बदल्यांचे आदेश देण्यात आले आहेत. सोमवारी झालेल्या बदल्यांमध्ये देहूरोड विभागाचे सहायक पोलीस आयुक्त पद्माकर घनवट यांची सहायक आयुक्त, प्रशासन येथे बदली करण्यात आली आहे. तर घनवट यांच्या जागी प्रशासनचा कार्यभार असलेले सहायक आयुक्त मुगुटलाल पाटील यांच्याकडे देहूरोड विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. मंगळवारी सहाय्यक पोलीस आयुक्त बाळासाहेब कोपनर यांची सहाय्यक पोलीस आयुक्त पिंपरी विभाग येथे बदली झाली. पिंपरी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त विठ्ठल कुबडे यांचे वाहतूक शाखेत बदली झाली. तर भोसरी एमआयडीसी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त डॉक्टर विवेक मुगळीकर यांच्याकडे गुन्हे एकची विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे.

# केंब्रिज प्री स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**पिंपरी**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** केंब्रिज चाम्स इंटरनॅशनल प्री स्कूल कृष्णानगर ब्रांच व पिंपरी चिंचवड शहरातील सर्व ब्रांच मधील चिमुकल्यांनी उत्साहात वार्षिक स्नेहसंमेलमध्ये भाग घेतला होता. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून केंब्रिज इंटरनॅशनल प्री स्कूलचे चेअरमन धनंजय वर्णेकर सर, सहायक आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका अण्णा बोदडे, एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र निकाळजे तसेच माजी महापौर अपर्णाताई डोके, सुरेश भोईर, सोनाली कुटे, अमोल काळे, नरेश टिळेकर, नम्रता जवंजाळ व स्मिता मॅडम उपस्थित होते. तसेच कृष्णानगर ब्रांचचे डायरेक्टर कीर्ती मारुती जाधव व श्री. मारुती गणपत जाधव यांनी आभार व्यक्त केले.

# महाराष्ट्रातील साखर उत्पादन वाढणार

## कारखान्यांमधील २५ किलोमीटरची अट रद्द होणार?

पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी। राज्यात ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान बिगरमोसमी पाऊस झाल्याने ऊसाची उत्पादकता आणि साखर उताऱ्यामध्ये वाढ होण्याचा अंदाज वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनने (विस्मा) वर्तविला आहे. हंगामाच्या पूर्वी ८८ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज होता. त्यात आता १० टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे. 'इथेनॉल'सह अन्य उपपदार्थांची निर्मिती वगळून एकूण साखर उत्पादनात ७.५ टक्के वाढ होऊन राज्यात चालू हंगामातील साखर उत्पादन ९५ लाख टन होईल, असे 'विस्मा'चे म्हणणे आहे.विस्माच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये राज्यातील खासगी व सहकारी साखर कारखान्यांच्या ३१ डिसेंबर २०२३ अखेर झालेले प्रत्यक्ष व अपेक्षित



गाळप, साखर उत्पादन व साखर उताऱ्याचा कारखानानिहाय आढावा घेण्यात आला. राज्यात सध्या ९६ सहकारी व ९९ खासगी असे एकूण १९५ साखर कारखाने गाळप करीत आहेत. त्यांची गाळपक्षमता नऊ लाख टन प्रतिदिन आहे. राज्याचा गळीत हंगाम अंदाजे ९० ते १०० दिवसांचा अपेक्षित होता. डिसेंबरअखेर एकूण ९४६ लाख टन ऊस उपलब्धतेचा अंदाज होता. या अंदाजात पाच टक्के वाढ होऊन ९९३ लाख टन ऊस उपलब्ध होण्याची शक्यता आहे. हंगाम सुरू झाल्यापासून ६० दिवसांत डिसेंबरअखेर ४२८ लाख टन उसाचे गाळप झाले असून, ३८.२० लाख टन साखरनिर्मिती झाली आहे. अद्याप ५६५ लाख टन गाळप बाकी आहे. बिगरमोसमी पावसामुळे प्रतिहेक्टरी ऊसाच्या उत्पादनात ८ ते १० टक्के वाढ होईल, असे 'विस्मा'चे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी सांगितले. इथेनॉल निर्मितीस घातलेल्या बंदीचा पुनर्विचार करण्याची विनंती केंद्र सरकारला करणार असल्याचे त्यांनी सांगितले.डिसेंबरअखेर ४० टक्के ऊस गाळपातून ३८ लाख टन साखर उत्पादन झाले असल्याने उर्वरित ६० टक्के ऊस गाळपातून एकूण ९५ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज विस्माने वर्तविला आहे. हंगामाच्या सुरुवातीस महाराष्ट्रात ८८ लाख टन निव्वळ साखरेच्या उत्पादनाचा अंदाज साखर आयुक्तालय व साखर संघाने व्यक्त केला होता. कर्नाटक व गुजरातमध्येही अवकाळी पाऊस झाल्याने त्याही राज्यांमध्ये ऊसाच्या प्रतिहेक्टरी उत्पादनात आठ ते १० टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. उत्तर प्रदेश, कर्नाटक व गुजरात या राज्यांत देशातील एकूण साखर उत्पादनापैकी ८० टक्के उत्पादन होते. देशांतर्गत वापरासाठी २७५ ते २८० लाख टन

### 'एफपीओ'ना परवानगी द्या

» सर्वच कारखान्यांनी आपल्या गाळप क्षमतेत वाढ केली आहे, त्यामुळे उसाच्या उपलब्धतेचा प्रश्न येत नाही. २५ किलोमीटरच्या हवाई अंतराच्या नियमामुळे काही राजकीय नेत्यांची साखर उद्योगात मक्तेदारी निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या उसाला चांगला दर मिळण्यासाठी साखर उद्योगात खुली स्पर्धा निर्माण होण्याची गरज आहे. त्यामुळे हवाई अंतराची अट रद्द करावी, अशी आग्रही मागणी शेतकरी नेत्यांनी केली.हवाई अंतराची अट रद्द करून शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना (एफपीओ) साखर कारखाने सुरू करण्याची परवानगी द्यावी. खासगी उद्योजकांना कारखाना सुरू करण्याची परवानगी देऊ नका. पण, पाच ते सहा कुटुंबांच्या हातात गेलेला हा उद्योग सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुलांसाठी खुला करावा.

साखर लागते. या वर्षीचे अपेक्षित साखर उत्पादन ३२० लाख टन होणार असल्याने मुबलक साखर उपलब्ध होणार आहे. साखर कारखान्यांमधील २५ किलोमीटर हवाई अंतराची अट रद्द करण्याची आग्रही मागणी मंगळवारी पुन्हा शेतकरी संघटनांनी साखर आयुक्तांकडे केली. या मागण्यांबाबतचा सविस्तर अहवाल साखर आयुक्त हे राज्य सरकारला सादर करणार आहेत, अशी माहिती साखर आली. राज्य सरकारच्या आदेशानुसार मंगळवारी साखर आयुक्तालयात साखर आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि ऊस दर नियंत्रण मंडळाच्या सदस्यांची संयुक्त बैठक झाली.

# चिखली रामायण मैदानात होणार भजन महोत्सवाचा 'निनाद'!

## निवडणूक निकालाविरोधात कारणे देत न्यायालयात याचिका

पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी। श्रीक्षेत्र आळंदी आणि श्रीक्षेत्र देहू या तीर्थक्षेत्रांच्या सानिध्यात असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये भजन महोत्सवाचा 'निनाद' ऐकायला मिळणार आहे. वारकरी आणि अध्यात्मिक सांप्रदायाचा वारसा असलेल्या शहरामध्ये ही स्पर्धा भक्तीमय वातावरणात संपन्न होणार आहे.श्रीक्षेत्र अयोध्या येथे राम जन्मभूमी मंदिराचे उद्घाटन व प्राणप्रतिष्ठा दि. २२ जानेवारी २०२४ रोजी होत आहे. या निमित्त चिखली- जाधववाडी येथे




भजन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे. चिखली- जाधववाडी येथील रामायण मैदानावर दि. गुरूवार, दि.१८ जानेवारी ते शनिवार दि. २० जानेवारी २०२४ असे तीन दिवस भजन महोत्सव होणार आहेत. त्यासाठी वारकरी क्षेत्रातील जाणकार ३ परीक्षक असतील. प्रत्येक भजनी मंडळाला १५ मिनिटे सादरीकरण करता येणार आहे. प्रत्येक भजनी मंडळात १० सदस्य संख्या, सांप्रदायिक क्षेत्रातील गवळणी व अभंग सादर होतील. भजनासाठी साहित्य स्पर्धक संघाला स्वत: आणावे लागेल. एकूण तीन दिवसांत रोज ३० भजनी मंडळांना महोत्सवात सहभागी होता येईल.

> “प्रभू रामचंद्र यांचे जन्मभूमी मंदिर साकारले आहे. त्याची प्राणप्रतिष्ठा दि.२२ जानेवारी रोजी होत आहे. हा आपल्यासाठी ऐतिहासिक आणि मंगलमय क्षण आहे. प्रभू रामचरणी भजन सेवा व्हावा. या करिता भजन महोत्सव आयोजित केला आहे. या भक्तीमय सोहळ्याला पंचक्रोशीतील नागरिकांनी उपस्थित रहावे आणि भजन श्रवणाचा आनंद घ्यावा, असे आवाहन करतो. - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# बारामतीमध्ये भाजपचं चांगलं काम

## त्यामुळेच अजित पवार इकडे आले : गोपीचंद पडळकर



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** बारामतीमध्ये भाजप चांगलं काम करत होते, त्यामुळेच अजित पवारांना इकडे यावं लागले असे वक्तव्य भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी केलेय. तसेच बारामतीमध्ये आमच्या विचाराचा खासदार होणार हे एक लाख टक्के खरे आहे. तो भाग्यवान कोण असेल मला माहित नाही, असेही पडळकर म्हणाले. ते बारामतीमध्ये बोलत होते. भाजप आमदार गोपीचंद पडळकर आज बारामती दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. त्याशिवाय बारामतीमध्ये भाजप चांगलं काम करत होते, म्हणून अजित पवार इकडे आले, असे वक्तव्य केले. पडळकर म्हणाले की, अजित पवार सत्तेत आल्यापासून मी बारामतीला आलो नव्हतो. पण अजून लोकांच्या संपर्कात आहे. बारामतीत दुष्काळ आहे, सरकारने यात लक्ष घातले पाहिजे. मराठवाड्याला पाणी देण्याची कल्पना आली, बारामतीच्या पाण्याच्या संदर्भात देवेंद्र फडणवीस यांना पत्र देणार आहेत. राज्याचे मुख्यमंत्री प्रकल्प आणण्यासाठी परदेशात गेले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस इथं राज्यकारभार सांभाळायला सक्षम आहेत. विरोधकांचा जनधर संपला आहे, त्याच्यामुळे विरोधक असे टीका करतात. विधानसभावर जाणे प्रत्येकचे स्वप्न असते, पक्ष माझा विचार करेल. बारामतीत भाजप चांगले काम करीत होते, त्यामुळे अजित पवारांना इकडे यावं लागले. भाजपचे खासदार दिल्लीत पाठवायची जबाबदारी आमची आहे. इथे आमच्या विचाराचा खासदार होणार हे १ लाख टक्के खरे आहे. तो भाग्यवान कोण असलं मला माहित नाही, असे गोपीचंद पडळकर म्हणाले. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. पण ओबीसीमधून द्यायला आमचा विरोध आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नाही. धनगर समाजाच्या आरक्षण संदर्भात आमची लढाई अंतिम टप्प्यात आहे. न्यायालयात आमच्या बाजूनं निकाल लागेल असे आम्हाला वाटतेय. मराठा समाजाचा प्रश्न वेगळा आहे तो समजून घेतला पाहिजे, असे पडळकर म्हणाले. महाविकास आघाडी सरकारने बाजू नीट मांडली नाही. गायकवाड आयोग टिकला असता तर मराठा समाजाला आरक्षण मिळाले असते. जरांगे यांनी मराठा समाजाची फसवणूक करू नये यातून काही मिळणार नाही. मराठा समाजाला आरक्षण द्यावे ते वेगळं द्यावे, असेही ते म्हणाले. उद्धव ठाकरे यांच्यासोबतची ५० लोकं निघून गेले, तुम्ही बहुमत चाचणीला थांबले नाहीत, तुम्ही आधीच पळून गेलात. विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निर्णय मान्य नसेल तर कोर्टात जा. लोकांच्यात बाजार मांडून साध्य काय करणार आहात, असा सवाल पडळकरांनी उपस्थित केला.देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री करण्यासाठी भाजपवाल्यांना शिवसेनेला मतदान केलं होतं आणि तुम्ही लोकांची दिशाभूल केली. राष्ट्रवादीचा देखील निकाल लागणार आहे, काय लागेल पाहू? अजित पवारांनी नंतर प्रयोग केला आहे. फार अभ्यास करून केला असेल. जे शिंदेंनी केले त्यापेक्षा जास्त अभ्यास अजित पवारांनी केला असेल. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याकडे काय राहिले नाही, त्यामुळे असे सात-आठ महिने असंच होत राहणार लोकांची दिशाभूल होत राहणार, असेही पडळकर म्हणाले.

### आरक्षण मिळाले पाहिजे...

» मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. पण ओबीसीमधून द्यायला आमचा विरोध आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नाही. धनगर समाजाच्या आरक्षण संदर्भात आमची लढाई अंतिम टप्प्यात आहे. न्यायालयात आमच्या बाजूनं निकाल लागेल असे आम्हाला वाटतेय. मराठा समाजाचा प्रश्न वेगळा आहे तो समजून घेतला पाहिजे, असे पडळकर म्हणाले. महाविकास आघाडी सरकारने बाजू नीट मांडली नाही. गायकवाड आयोग टिकला असता तर मराठा समाजाला आरक्षण मिळाले असते.

# वेगरे गावच्या सरपंचपदाच्या वादाने ठिणगी पडली

## पोळेकरने शरद मोहोळवर गोळ्या झाडून मामाचा बदला घेतला

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुण्यातील गँगस्टर शरद मोहोळच्या हत्येमागे दहशतवाद्याचा हात असल्याचा आरोप काही संघटना करत असल्या तरी पुणे पोलिसांनी या प्रकरणात भाजपचा पदाधिकारी असलेल्या विठ्ठल शेलारसह २४ जणांना अटक केली आहे. शरद मोहोळ आणि विठ्ठल शेलार हे दोघेही भाजपशी संबंधित होते. मात्र दोघांमध्ये मुळशी तालुक्यातील वर्चस्वाचा वाद या हत्येला कारणीभूत ठरल्याचा पुणे पोलिसांचा दावा आहे. त्याचबरोबर शरद मोहोळच्या हत्येला मुळशी तालुक्यातील वेगरे गावच्या सरपंचपदाचा वाद देखील कारणीभूत ठरल्याचं समोर आले आहे.पुण्यातून लवासा सिटीकडे जाताना वाटेत लागणारं मुठा नावाचं गाव हे शरद मोहोळच तर तिथून पुढे पंचवीस किलोमीटर अंतरावरील वेगरे नावाचं गाव शरद मोहोळची हत्या घडवून आणणाऱ्या नामदेव कानगुडेच तर मुठा गावापासून नऊ किलोमीटर अंतरावर असलेलं उरवडे गाव आहे. या हत्येतील दुसरा मुख्य आरोपी असलेल्या विठ्ठल शेलारचे आहे. मुळशी खोऱ्यातील या लहान - लहान गावांमध्ये वर्चस्व कोणाचं राहणार यातून निर्माण वादातून शरद मोहोळची हत्या झाल्याचं समोर आले आहे. २०१० मध्ये नामदेव कानगुडेकडून स्थानिक वादातून शरद मोहोळच्या मावस भावाला मारहाण करण्यात आली. शरद मोहोळने त्याचा बदला घेण्यासाठी नामदेव कानगुडेला मारहाण केली. पुढे दोघांमध्ये समझोता झाला आणि दोघे एकत्र काम करायला लागले. मात्र मागीलवर्षी वेगरे गावाच्या ग्रामपंचायत निवडणुकीत नामदेव कानगुडेची भावजय निवडणुकीला उभी राहिली. कनगुडेने शरद मोहोळकडे त्यासाठी मदत मागितली. मात्र ती न मिळाल्यानं दोघांमध्ये वाद झाला. त्यातून अपमानित झालेला नामदेव कानगुडेला रडताना त्याचा भाचा असलेल्या साहिल पोळेकरने पाहिलं आणि दोघांनी मिळून शरद मोहोळचा काटा काढायचं ठरवलं .

शरद मोहोळच्या टोळीतील धुसफूस शरद मोहोळचा विरोधक असलेल्या विठ्ठल शेलारला समजली. २०१७ मध्ये भारतीय जनता पक्षात प्रवेश केलेल्या विठ्ठल शेलारची टोळी हिंजवडी आय टी पार्कच्या परिसरात सक्रिय होती. मात्र २०२१ ला तुरुंगातून सुटून आल्यानंतर शरद मोहोळने शेलारच्या एरियात शिरण्याचा करण्याचा प्रयत्न केला. त्यातून झालेल्या वादातून शेलारच्या गाडीवर शरद मोहोळच्या साथीदारांनी हायवेला असलेल्या सयाजी हॉटेलजवळ ऑक्टोबर २०२२ मध्ये हल्ला केला. विठ्ठल शेलारला त्यावेळी जीव वाचवून पळ काढावा लागला .